प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

प्रेस सम्पर्क प्रभाग, केंद्रीय कार्यालय, पोस्ट बॉक्स 406, मुंबई 400 001
फोन: 2266 0502 फैक्स: 2266 0358, 2270 3279
PRESS RELATIONS DIVISION, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
RBI On Internet: http://www.rbi.org.in
हिन्दी वेबसाइट http://www.rbi.org.in/hindi
Email: helpprd@rbi.org.in

दिनांक : १० ऑगस्ट २००६

**नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रस्त असलेल्या क्षेत्रात व्यवहार अबाधित रहावेत म्हणून बँकांसाठी उपाय**

नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रात बँक व्यवहार व सेवांमध्ये सातत्य राहिल याची खात्री करुन घेण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सर्व अनुसूचित बँकांना निर्देश दिलेले आहेत. या निर्देशांमध्ये, ग्राहकांना त्यांच्या बँकखात्यांचे व्यवहार सतत करता यावेत, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रस्त झालेल्या व्यक्तींना , शासकीय / इतर संस्थांनी केलेल्या आर्थिक मदती मिळाव्यात म्हणून त्यांना नवीन खाती उघडण्यास मदत करावी यांचाही समावेश आहे. याबाबतच्या मार्गदर्शक तत्त्वात , चेक्सचे समाशोधन , रोकड रकमांचा पुरवठा, या सारख्या इतरही सेवांमध्ये सातत्य राहण्यासाठी आवश्यक असे उपाय समाविष्ट आहेत.

नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रस्त झालेल्या क्षेत्रात बँक व्यवहार सेवांचे पुर्नस्थापन करण्यामध्ये उद्भवणाऱ्या अनेक प्रश्नांमध्ये लक्ष घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेने स्थापन केलेल्या अंतर्गत कार्यकारी गटाने केलेल्या शिफारशींचा पाठपुरावा करण्यासाठी, आणि तसेच अशा ग्रस्त व्यक्तिंना मदत देण्यासाठी असलेल्या स्थायी निदेशांसाठीही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली. २००५-०६ च्या बँकेच्या मध्यावधि धोरणात घोषित केल्यानुसार रिझर्व्ह बँकेने ऑक्टोबर महिन्यात अंतर्गत कार्यकारी गटाची स्थापना केली.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार , जेथे नैसर्गिक आपत्तीमुळे बँकेच्या शाखा ग्रस्त झाल्या असून त्या नेहमीप्रमाणे काम करु शकत नसतील तेथे, रिझर्व्ह बँकेला कळवून बँका तात्पुरत्या ठिकाणां / जागांवरुन बँक व्यवहार करु शकतात. ग्रस्त झालेल्या क्षेत्रात, सॅटेलाईट कार्यालये, विस्तारित काउंटर्स, किंवा फिरत्या बँक सुविधा देवून तेथे बँक सेवा दिली जाईल याची खात्री बँका करुन घेऊ शकतात. याशिवाय ग्राहकांची रोख रकमेची गरज पूर्ण करण्यासाठी स्थिर ठेवींबाबतच्या खात्यांबाबत दंडाची आकारणी माफ करु शकतात. एटीएम ची सुविधा लौकरात लौकर पुर्नस्थापित व्हावी किंवा अशा सुविधा देण्यासीठी पर्यायी व्यवस्था करण्यास, प्राधान्य देण्यात यावे. ग्राहकांना इतर एटीएम नेटवर्क्स तसेच फिरते एटीएम्स यांची सुविधा उपलब्ध करवून देण्याबाबत बँकांनी सक्रिय विचार करावा जेथे चलन तिजोरी (करन्सी चेस्ट) ची व्यवस्था विस्कळित झाली आहे तेथे तात्पुरत्या काळासाठी व रोकड रकमेची गरज भागविण्यासाठी, तसेच चलन तिजोऱ्यांचा एक भाग म्हणून रोकड रक्कम जप्त करण्यासाठी डिपॉझिटरीज उघडण्यासाठी बँकांना परवानगी देण्यात आली आहे.

वित्तविषयक मदत देताना बँका, त्यांच्या अस्तित्त्वात असलेल्या ग्राहकांना रु.१०,००० पर्यंतची कर्जे विनातारण देऊ शकतात. तसेच, केवळ अस्तित्त्वात ग्राहकांनाच नव्हे तर पात्र असलेल्या इतर ग्राहकांनाही, उत्पादन-कार्य सुरु ठेवण्यासाठी, आपत्तीचे गांभीर्य व पुनरावृत्ती पाहून वेळेवर नवीन वित्तसहाय्य करु शकतात, एवढेच नव्हे तर पुनर्रचित मुदत कर्जांच्या परतफेडीचा काळ ७ ते १० वर्षेपर्यंत, आणि कर्जफेड काल १ वर्ष पुढे ढकलण्याच्या अधिकारासह वाढवू शकतात.

गुजराथ, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्र या तीन राज्यात आलेल्या पुरांच्या संदर्भात, रिझर्व्ह बँकेने, राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या (एस एल बी सी) आमंत्रकांना, एस एल बी सी च्या विशेष सभा तातडीने घेऊन ग्रस्त झालेल्या लोकांना मदत कार्य देण्यासाठी उचलावयाच्या पावलांचा आढावा घेण्यास सांगितले आहे.

अल्पना किल्लावाला,

प्रमुख महाव्यवस्थापक

प्रेस रिलीज २००६-२००७/२०७